सं.फौ.ख.क्र. ४३२/२०२५

सरकार वि. किसन

# निशाणी क्र. १ वरील आदेश

---

अभिलेखाचे अवलोकन केले असता, अन्वेषण अधिकारी यांनी दोषारोपपत्रासोबत व दोषारोपपत्र दाखल केल्यानंतर आजपर्यंत रासायनिक विश्लेषण अहवाल सादर केला नाही. सबब खटल्याची सुनावणी होवूनही निष्फळ ठरण्याची शक्यता अधिक आहे. प्राप्त परिस्थिती पाहता भविष्यात सुध्दा अहवाल सादर होईल, असे दिसत नाही. अशा परिस्थितीत खटल्याची कार्यवाही थांबवणे न्यायोचित आहे. परिणामी, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५८ अन्वये खटल्याची कार्यवाही थांबवण्यात आली.

२. आरोपीस मुक्त करण्यात आले.

३. आरोपीचे जामीनबंधपत्र रद्द करण्यात आले.

४. जप्त मुद्येमाल अपीलाचे मुदतीअंती नियमानुसार नष्ट करणेकामी अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांचेकडे पाठविण्यात यावा.

SWAPNIL LILADHAR RAMTEKE

Digitally signed by SWAPNIL LILADHAR RAMTEKE
Date: 2026.03.11 13:26:41 +0530

(स्वप्नील लि. रामटेके)

दिनांक – ११/०३/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, संग्रामपुर

सं.फौ.ख.क्र. ४३२/२०२५

सरकार वि. किसन

# <u>प्रमाणपत्र</u>

प्रमाणित करण्यात येते की, पीडीएफ फाईल मधील मजकूर हा मुळ न्यायानिर्णयाप्रमाणे शब्द न शब्द जशास तसा व बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव – एस. जी. जैन

कार्यालयाचे नाव – न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, संग्रामपुर

लघुलेखक